| | | |
|---|---|---|
| MHGO040007452025 | DISTRICT COURTS MAHARASHTRA<br>सत्यमेव जयते | दाखल दिनांक ०३.०५.२०२५.<br>नोंदणी दिनांक ०३.०५.२०२५.<br>**निकाल दिनांक २७.०३.२०२६**<br>कालावधीः वर्ष महिने दिवस<br>०० १० २४ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव यांचे न्यायालयात, आमगांव.**
**(पिठासीन अधिकारी ए. आर. जोशी)**

---

<u>म.सं.कौ.हि.का. अर्ज क्र. १५/२०२५.</u> <u>नि. क्र. २१.</u>

**सौ सुनिता देवानंद चवारे,**
वयः– २८ वर्षे, धंदा– घरकाम,
रा. के/ऑफ महेश राऊत, मु. रामाटोला, पो. पिपरीया,
ता. सालेकसा, जि. गोंदिया. ..... अर्जदार.

**विरुध्द**

[१] **देवानंद ईश्वरजी चवारे,**
वयः– ३४ वर्षे, धंदा– शेती,
रा. डोंगरगांव, पो. कोकडी, ता. देसाईगंज, वडसा,
जि. गडचिरोली, महा.

[२] **सौ. कल्पना करण आमले,**
वयः– ३८ वर्षे, धंदा– लग्न जोडणारी,
राह. मु. गोठणगांव, पो. नवेगांवबांध,
ता. मोरगांव अर्जुनी, जि. गोंदिया. ..... गैरअर्जदार

---

**अर्जदारातर्फे श्री जी. सी. साखरे विधिज्ञ.**

**गैरअर्जदार क्र. १ व २ तर्फे श्री बी. एस. पाथोडे विधिज्ञ.**

---

**<u>न्या य नि र्ण य</u>**

(दिनांक २७ मार्च २०२६ रोजी घोषित)

अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५, कलम १२ अन्वये पोटगी, राहण्याची सोय, नुकसान भरपाई व संरक्षण आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे;</u>**

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक १८.०४.२०२३ रोजी त्यांच्या समाजात प्रचलीत असलेल्या जातीरिवाजाप्रमाणे मौजा रामाटोला, पो. पिपरीया ता. सालेकसा जि. गोंदिया येथे संपन्न झाले. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदाराच्या घरी नांदायला गेली व आपल्या वैवाहिक जिवनाची सुरुवात केली.

३. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र. १ हा दारुच्या व्यसनी आहे. लग्नानंतर गैरअर्जदार क्र. १ हा मात्र काही दिवस चांगले राहिले परंतु एक महिन्यानंतर गैरअर्जदार क्र. १ हा तिच्याशी चांगली वर्तणुक करत नव्हता व शिवीगाळ करत होता. गैरअर्जदार क्र. १ नेहमी रात्री दारु पिवून घरी येत होता व अर्जदाराला मारहाण देखील करत होता. गैरअर्जदार क्र. १ हा गैरअर्जदार क्र. २ च्या मामेसासऱ्याचा मुलगा आहे. गैरअर्जदार क्र. १ नेमही दारु पिते व त्याचे लक्षण चांगले नाही हे माहीत असतांना सुद्धा गैरअर्जदार क्र. २ ने सर्व गोष्टी लपवून अर्जदाराची फसवणूक केली.

४. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र. १ हा ड्रायव्हर चा काम करतो आणि संपूर्ण पगार व कमाई दारु पिवून खर्च करते. त्यामुळे अर्जदाराला दर दिवशी उपासी राहावे लागते. अर्जदाराजवळ कोणतेही आर्थिक साधन नसतांना सुद्धा गैरअर्जदार क्र. १ तिला दारु पिण्यासाठी पैसे मागते आणि तिने नकार दिले तर तिला मारहाण करते. गैरअर्जदार क्र. १ हा अत्यंत तापट स्वभावाचा आहे आणि त्याच्या हातामध्ये कोणतीही वस्तुने तो अर्जदाराला मारहाण करते.

५. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र १ हा दारुचा व्यसनी व्यक्ती आहे आणि तो नेहमी दारु पीवून तिला अश्लील शब्दात शिवीगाळ करुन मारहाण

करत होता. त्यामुळे तिने गैरअर्जदार क्र. १ विरुद्ध तक्रार दाखल केली. परंतु, गैरअर्जदार क्र. १ व त्यांचे नातेवाईकांनी तिला धमकी दिली की '' तिला आता जिवंत मारल्याशिवाय राहणार नाही'' त्यामुळे अर्जदार आपल्या आईवडीलांच्या घरी त्यांच्या दयेवर राहत आहे. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने कधीही तिला उदरनिर्वाह करीता कोणतेही साधन पुरविले नाही.

६. अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र. १ हा शारिरीक दृष्टया सबळ असुन तो ड्रायव्हर च्या काम करतो व त्यातुन दरमाह २०,०००/– ते २५,०००/– रुपये कमवितो. तसेच अर्जदाराकडे कोणतेही काम नाही व तिला उत्पन्नाचे कोणतही साधन नसल्यामुळे ती स्वतःचे पालनपोषण व उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. असा प्रकारे सध्याचे आवश्यक वस्तूचे बाजारभाव पाहता अर्जदाराला उदरनिर्वाहकरीता दरमाह १०,०००/– रुपये, शारिरीक छळ केल्याबद्दल २,५०,०००/– रुपये आणि अर्जाच्या खर्च करीता रुपये रक्कम १०,०००/– रुपये गैरअर्जदार क्र. १ हे सहजपणे देवू शकतात. म्हणून अर्जात मागीतलेल्या सर्व बाबी मंजूर करण्यात यावे अशी अर्जदाराने विनंती केली आहे.

७. गैरअर्जदारांनी दिनांक ०३.०२.२०२६ रोजी नि. क्र. १५ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले. त्यांनी अर्जातील प्रतिकूल कथनांचा नकार करुन कथन केले की, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज खोटा दाखल केला असून, गैरअर्जदार क्र. १ ने तिच्या कधीही कौटूंबिक हिंसाचार केलेला नाही. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ च्या घरी नांदण्यास आली. परंतु, लग्नाच्या दुसऱ्या दिवशीच अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ला म्हणाली की, '' हा लग्न माझ्या मर्जीने झाला नाही, मला तुझ्या सोबत झोपू नको'' असे बोलून तिने शारिरीक संबंध बनवण्यास मनाई केली. गैरअज्रदार क्र. १ ने अर्जदाराला खूप समजाविण्याचे पर्यत्न केले. परंतु तिने आपले वैवाहिक कर्तव्य करण्यास मनाई केली. तरीसुद्धा गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचे बेकायदेशीर कृत्य आपले वैवाहिक जीवन वाचविणे करीता सहन करीत होता.

८. गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, गैरअर्जदार क्र. १ ने तिला नेहमीच चांगली वागणुक दिली परंतु अर्जदार हिने हळु–हळु आपले बेकायदेशीर कृत्य वाढविले व

घरातील कामे करण्यास मनाई केली. अर्जदार नेहमी आपले माहेरी जात होती व परत येत नव्हती. तसचे अर्जदाराचे वडील गैरअर्जदाराला त्यांच्या घरीच राहा असे म्हणत होते. परंतु, गैरअर्जदार क्र. १ वर त्याची ''आईची जिम्मेदारी होती, त्यामुळे तो तिथे राहु शकत नव्हता'', असे त्याने अर्जदाराचे वडीलांना सांगितले. त्यामुळे अर्जदाराचे वडील खुप नाराज झाले. गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराच्या माहेरी राहणास तयार नव्हता. त्यामुळे अर्जदार त्याला वारंवार अपमानीत करत होती व त्याच्या घरी येण्यास मनाई करत होती.

९. गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, दिनांक १८.०८.२०२४ रोजी ०९:०० वाजतेच्या सुमारास अर्जदार हिने गैरअर्जदारा क्र. १ ला म्हटले की, '' तु माझ्या माहेरी येतेस की नाही, नाही येत असतील तर तु मला तलाक दे,'' '' तुझ्या सारखे १७ माझे पाशी आहे'', असे बोलुन अश्लील शब्दात शिवीगाळ करुन त्याच्या सोबत राहण्यास नकार दिली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने अनेक वेळा अर्जदाराला आपले घरी नांदण्यास आणण्याचे प्रयत्न केले. परंतु ते सर्व निष्फळ ठरले.

१०. गैरअर्जदार पुढे असे कथन करतो की, अर्जदार हि शिक्षीत आहे आणि टेलरींग व शिवणकाम करते. त्यातून दरमाह अर्जदार १०,०००/– रुपये कमविते. असाप्रकारे, ती स्वतःला सांभाळण्यासाठी सक्षम आहे. याउलट, गैअर्जदार क्र १ रोजंदारी मजुरीचे काम करीत असुन तो कधी–कधी २,०००/– ते ३,०००/– रुपये कमवितो. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ ने कधीही अर्जदारावर घरघुती हिंसाचार केले नाही. त्यामुळे अर्जदाराला वेगळी पोटगी भत्ता किंवा नुकसान भरपाई मागण्याचे कोणतेही अधिकार नाही. म्हणून, अर्जदाराने दाखल केलेल्या सदरचा अर्ज पुर्ण खोटा व बनावटी आहे म्हणून सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

११. अर्जदाराचा पुरावा, युक्तीवाद व कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे निष्कर्षासाठी निर्माण झाले. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | अर्जदार असे सिध्द करतात काय की, गैरअर्जदारांनी कौटुंबिक हिंसाचार केला ? | अंशतः होकारार्थी |
| २. | अर्जदार मागणी केल्याप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**अर्जदाराचा पुरावा –**

१२. अर्जदाराने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि. क्र. १८ वर दाखल केले. अर्जदार हिचा सरतपास नि. क्र. १८ च्या खाली घेण्यात आला. तिने तिच्या पुराव्यात, अर्जात कथन केल्याप्रमाणे सर्व बाबींची पुर्नरावृत्ती केली. तसेच तिने कथन केले की, तिच्या सरतपासावर तिची सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तसेच लग्न पत्रीका नि. क्र. २० वर आहे.

१३. सदर साक्षीदाराचा गैरअर्जदारांतर्फे सविस्तर उलटतपास घेण्यात आला, अर्जदार हिने गैरअर्जदारांतर्फे दाखल लेखी म्हणणेच्या प्रतिकूल कथनांचा नकार दिले व पुढे मान्य केले की, ती बी. ए. शिक्षण घेत आहे. ती सासरी फक्त १५ दिवस नांदली. तेव्हा पासुन ती माहेरी राहत आहे. तिला गैरअर्जदार क्र. १ आवडला होता. त्यामुळे तिने लग्नाला सहमती दिली होती. पुढे तिने मान्य केले की, तिला लाडकी बहिण योजनेचे १५००/– रुपये मिळतात. तसेच इतर प्रश्नांना तिने नकारार्थी उत्तरे दिली. त्यानंतर नि. क्र. २० वर पुरसीस दाखल करुन अर्जदार क्र. १ ने तिच्या पुरावा बंद केला.

१४. गैरअर्जदार हे प्रकरणात हजर झाले, परंतु त्यांनी त्यांचेतर्फे कोणतेही साक्षीदार तपासले नाही व लेखी पुरावा दाखल केला नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा विनाआव्हानीत राहीला.

**मुद्दा क्र. १ बाबतः–**

१५. अभिलेखावर एकंदरीत पुराव्याच्या विचार करता असे दिसून येते की,

अर्जदाराचे गैरअर्जदार क्र. १ सोबत लग्न झालेला आहे व ती दिनांक १८.०४.२०२४ रोजी पासून माहेरी राहत आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात आणि शपथपत्रात तिला गैरअर्जदार क्र. १  हा दारुच्या व्यसनी असुन नेहमी दारु पिवुन तिच्यावर कौटुबिंक हिंसाचार करत असल्याचे सांगितले आहे. गैरअर्जदाराचे वकिलांनी अर्जदाराचे सविस्तर उलटतपास घेतले आहे. परंतु, अर्जदार तिच्या उलटतपासामध्ये सुद्धा तिच्यावर कौटुबिंक हिंसाचार झाल्यावर ठाम राहिली आहे. त्यामुळे अर्जदार हिने दिलेल्या पुराव्यावरुन गैरअर्जदार क्र १ ने तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचे सिद्ध होते. अर्जदाराने पुराव्यात केलेली कथने ही विनाआव्हानीत आहेत. त्यामुळे अर्जदार हिने केलेले कथनांवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबतः–</u>**

१६. अर्जदार ही दिनांक १८.०४.२०२४ पासून माहेरी राहत आहे.  गैरअर्जदार क्र. १ ने  तिची कोणतेही निर्वाह भत्त्याची व्यवस्था केल्याबाबत दिसून येत नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा ड्रायव्हर चे काम करुन दरमाह २०,०००/– ते २५,०००/– रुपये कमवितो. असे अर्जदाराने तिच्या सरतपासात कथन केले आहे. मात्र त्याबाबत अर्जदाराचे तोंडी शब्दाशिवाय कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल केलेले नाही. मा. सर्वोच्च न्यायालय, यांचे न्यायनिर्णय ''***<u>(Rajnesh v. Neha and Ors, Criminal Appeal No. 730 of 2020 (Arising out of SLP (Crl.) No. 9503 of 2018)''</u>,*** नुसार अर्जदार व गैरअर्जदार यांना त्यांचे मालमत्तेबाबतचे शपथपत्र अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे. परंतु, अर्जदाराने तिचे मालमत्तेबाबतचे शपथपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही.

१७. एकंदरीत पुराव्याचा अवलोकन केले असता अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या लग्न झालेले असून ती गैरअर्जदार क्र. १ ची कायदेशीर पत्नी आहे व वैवाहीक संबंधातुन त्यांना कोणतेही अपत्य नाही. अर्जदार ही बी. ए. शिक्षण घेत आहे. तिला लाडकी बहीण योजनेचे १५००/– रुपये दरमाह मिळते. तसेच तिने मान्य केले आहे की, ती शारिरीक दृष्टया सक्षम आहे. त्यामुळे अर्जदार तिच्या गरजा भागवू शकते. परंतु, अर्जदार ही गैरअर्जदाराची नैतीक जबाबदारी असल्यामुळे अर्जदाराच्या दैंनदीन गरजा,

उदरनिर्वाहासाठी खर्च, औषधोपचाराकरिता खर्च व महागाईचा दर हा सर्व गोष्टी विचारात घेता गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराला दरमहा १,०००/– रुपये देणे योग्य व न्यायोचित होईल, असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराला कोणताही कौटूंबिक हिंसाचार करु नये.

३. गैरअर्जदार क्र. २ यांच्या विरुद्ध कोणताही आदेश नाही.

४. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराला दरमहा रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त) पोटगी म्हणुन हा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून द्यावेत.

५. सदर निर्वाह भत्ता प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत द्यावे.

६. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदारास या अर्जाच्या खर्चापोटी रक्कम रुपये १,०००/– (अक्षरी रुपये एक हजार फक्त) द्यावेत.

७. या न्यायनिवाडयाची प्रत दोन्ही पक्षकारांना तसेच पोलीस निरीक्षक, तालुका सालेकसा पोलीस ठाणे यांना मोफत देण्यात यावी.

८. वर नमूद पोटगी व्यतरिक्त कोणताही इतर भत्ता मंजूर करण्यात आलेला नाही.

JOSHI ATUL RATNAKAR

Digitally signed by JOSHI ATUL RATNAKAR
Date: 2026.03.30 16:43:14 +0530

(ए. आर. जोशी)

दिनांकः– २७.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आमगांव.